या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी
नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
94036 41482

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | गुरुवार ११ जूले २०२४ | अंक२१४ पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# शांतीत क्रांती; मराठा समाजाची आज बीडमध्ये शांतता रॅली

## मनोज जरांगे पाटील यांची उपस्थिती, अखंड मराठा समाजाकडून रॅलीची जय्यत तयारी, लाखोंच्या संख्येने उपस्थित रहा

### अनुभवी डॉक्टर देणार आरोग्य सेवा

मराठा आरक्षण जनजागृती आणि शांतता रॅलीत येणाऱ्या मराठा बांधवांना आपत्कालीन परस्थितीत आरोग्याच्या बाबतीत काही समस्या उद्भवल्यास त्याठिकाणी डॉ.प्रदिप शेळके, डॉ.संदीप येवले, डॉ.युवराज कोकाटे, डॉ.सुनिल बोबडे, डॉ.नितीन उगले, डॉ.मयूर मोरे, डॉ.मनोज मेंगडे हे आरोग्य सेवा देणार आहेत. तर विकास हाके, सुहास आगे, प्रदिप कवडे, अमोल बावळे, अशोक कोकाके, बिभीषण शेंडगे, प्रदिप माने, नितीन काकडे, राजेश काकडे हे मदत करणार आहेत.

### बीडमधील शाळांना आज सुट्टी

आज बीड शहरात सकल मराठा समाजाच्या वतीने रॅलीचे आयोजन केले आहे.त्यामुळे शहरातील मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहने व गर्दी होणार आहे. त्यामुळे बीड शहरातील सर्व रस्ते दि.११ जुलै रोजी सकाळी १० ते सायकांळी ६ वाजेपर्यंत बंद असल्यामुळे जिल्हादंडाधिकारी, बीड यांनी दिलेल्या निर्देशनानुसार बीड शहरातील सर्व माध्यम व व्यवस्थापनाच्या प्राथमिक ते उच्च माध्यमिक शाळांना दि.११ रोजी वार गुरुवार एक दिवसाची सुट्टी जाहिर करण्यात आली आहे. असे आदेश शिक्षणाधिकाऱ्यांनी काढले आहेत.

### अशी आहे पार्कींग व्यवस्था

गेवराई, माजलगाव: सिध्दीविनायक कॉम्प्लेक्स परिसर, छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल परिसर, रिलायन्स पेट्रोल पंप परिसर, मिनी बायपास परिसर, परळी, माजलगाव, धारूर, वडवणी, अंबाजोगाई, केज, बीड: शासकिय रूग्णालयाच्या पाठीमागे बिंदूसरा रेस्ट हाऊस परिसर, माने कॉम्पेल्क्स परिसर, निळकंठेश्वर मंदिर परिसर, कनकालेश्वर मंदिर परिसर, खंडेश्वरी मंदिर मंदिर व एमआयडीसी परिसर, फटाका मैदान, मोंढा रोड परिसर, आष्टी, पाटोदा, शिरूर: शासकिय आयटीआय परिसर, जुने व नवी पंचायत समिती परिसर, यशवंतराव चव्हाण नाट्यगृह रोड परिसर.


### 12 रुग्णवाहिका सेवेत

मराठा आरक्षण जनजागृती, शांतता रॅलीत उपस्थितांना अचानक उपचार घेण्यासाठी बाहेर हलविण्याची गरज पडल्यास याठिकाणी १२ रूग्णवाहिकांची सोय करण्यात आलेली असून सदरील रूग्णवाहिका या दिवसभर सेवेत असणार आहेत.प्रत्येक रूग्णवाहिकेमध्ये अनुभवी डॉक्टर देखील उपस्थित असणार आहेत.

### चहा, नाश्ता अन् पाण्याचे स्टॉल

मराठा शांतता रॅलीत लाखो लोक सहभागी होण्याचा अंदाज वर्तविला जात असून यावेळी ग्रामीण भागातून बीडमध्ये येणाऱ्या बांधवांची नाश्ता, पाण्याची गैरसोय होऊ नये, याची काळजी घेत शहरातील अखंड मराठा समाजाच्यावतीने चार ठिकाणी चहा, नाश्ता, आणि पाण्याचे स्टॉल उभे करण्यात येत आहेत. शिवाय विविध ठिकाणी काही व्यापारी देखील चहा, नाश्त्याची सोय करत आहेत.

**बीड/प्रतिनिधी:** मराठा आरक्षणातील 'सगेसायरे' अधिसुचनेच्या अंमलबजावणीसाठी सरकारने दि.१३ जुलैची वेळ मागवून घेतलेली असून आता मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत बीडमध्ये आज दि.११ रोजी शांतीत क्रांती करण्यासाठी मराठा आरक्षण जनजागृती आणि शांतता रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. अखंड मराठा समाजाकडून रॅलीची जय्यत तयारी करण्यात आली आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावे, मागील काही वर्षांपासून लढा सुरू आहे, मात्र या लढ्याला मनोज जरांगे पाटील यांना स्वत:चा जीव धोक्यात घालून निर्णायक वळणावर आणलेले आहे. अमरण उपोषण आणि मुंबई येथील मोर्चानंतर सरकारने सगेसोयरे अधिसुचना काढलेली असून सदरील अधिसुचनेची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी मागणी आहे. दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा उपोषण केल्यानंतर सरकारच्या शिष्टमंडळाने दि.१३ जुलैपर्यंत डेडलाईन मागविली होती. यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी शिष्टमंडळाला दि.१३ पर्यंत वेळ वाढवून दिलेली असून आता मराठवाड्यात मराठा आरक्षण जनजागृती आणि शांतता रॅलीचे आयोजन करण्यात येत आहे. आज बीडमध्ये शांतता रॅली होत असून सदरील रॅली सकाळी ११ वाजता मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून निघेल.सुभाष रोड मार्गे साठे चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे येथे येईल. याठिकाणी मनोज जरांगे पाटील हे सर्व मराठा बांधवांना संबोधित करतील, अशी माहिती, अखंड मराठा समाजाच्या वतीने प्रसिध्दी पत्रकाद्वारे देण्यात आली आहे. शांतता रॅलीसाठी आदर्श आचारसंहिता रॅलीत कोणीही समाज बांधव व्यसन करून येणार नाही, आलेल्या समाज बांधवांची पाणी व नाश्त्याची सोय करण्यासाठी मदत करावी, स्वंयसेवकांनी दिलेल्या जबाबदारी पुर्ण कराव्यात, गावातून येताना हातात भगवे झेंडे आणावेत, शिवाय घरावरही भगवे झेंडे लावावेत, दिलेल्या पार्कींगच्या ठिकाणीच आपली वाहने लावावीत, घोषणा देताना कोणत्याही जाती, धर्माच्या भावना दुखावणार नाहीत, याची काळजी घ्यावी. रॅलीत चालताना शिस्त पाळावी, महिला भगिणींची काळजी घ्यावी, सोबतच्या बांधवाना आरोग्यासंदर्भात काही त्रास सुरू झाल्यास तातडीने मदत करावी, रॅलीच्या रस्त्यात कचरा होणार नाही, याची काळजी घ्यावी. सार्वजनीक मालमत्तेचे नुकसान होणार नाही, व सार्वजनीक शांतता भंग पावणार नाही, याची काळजी घ्यावी.



### 5 हजार स्वंयसेवक तैनात

जिल्ह्यातून लाखावर मराठा बांधव बीड शहरात रॅलीसाठी येत असून याठिकाणी शिस्त पाळण्यासाठी आणि येणाऱ्या बांधवांना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी ५ हजार स्वंयसेवक सेवा देणार आहेत. यात एक हजार स्वंयसेवकांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. मागील काही दिवसांपासून यासाठी एक टिम काम करत आहे

